


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६१५ . वा | गुरुवार | दि. ३० नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# तब्बल ४०८ तास चाललेल्या बचाव मोहिम नंतर ४१ कामगारांना मिळाले नवीन जिवनदान...

**वृत्तसंस्था/उत्तराखंड**

उत्तराखंडच्या सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या ४१ कामगारांना बाहेर काढण्यासाठी अथक प्रयत्न सुरु आहेत. गेले १७ दिवस आणि ४०० हून अधिक तास हे कामगार बोगद्यात अडकून पडले आहेत. आपल्या कुटुंबापासून हे कामगार आता काही मीटर अंतरावर आहेत. अशात देशभरातील लोकांच्या मनात सवाल निर्माण झालाय तो म्हणजे गेले सतरा दिवस या कामगारांनी बोगद्यात काय केलं, कसे दिवस काढले. जगण्यासाठी या कामगारांनी कसा संघर्ष केला. याची माहिती पहिल्यांदाच समोर आली आहे. बोगद्यात अडकलेल्या कामगारांच्या डोळ्यासमोर फक्त अंधार होता. एकमेकांचे चेहरेही नीटसे दिसत नव्हते. होता तो पक्त काळोख आणि काळोख. १२ नोव्हेंबरला सिलक्यारा बोगद्याचा एका बाजूचा भाग कोसळला आणि बोगदा बंद झाला. आणि इथूनच सुरु झाला ४१ कामगारांचा जगण्याच संघर्ष. परिस्थिती इतकी बिकट होती की इथून लवकरच बाहेर पडता येणार नाही याची जाणीव अडकलेल्या कामगारांनाही झाली होती. पण त्यांनी हार मानली नाही. येणार प्रत्येक दिवस लढण्यासाठी ते सज्ज झाले. प्रबळ इच्छाशक्ती आणि कुटुंबियांना भेटण्याची आस यामुळे त्यांनी मिट्ट अंधाऱ्या बोगद्यात तब्बल ४०० हून अधिक तास लढा दिला. पाईपच्या सहाय्याने बोगद्यात अडकलेल्या कामगारांसाठी औषध, पाणी, जेवण याच्याबरोबर मनोरंजानाची काही साधनं पाठवण्यात आली. यात पत्त्यांचाही समावेश होता. वेळ घालवण्यासाठी कामगार तीन पत्ते, रम्मी खेळून स्वत:ला व्यस्त ठेवत होते. शरीर तंदरुस्त ठेवण्यासठी त्यांनी योगाही सुरुव केला. बचाव यंत्रणनेच्या मदतीने त्यांचं कुटुंबियांशी बोलणं सुरु होतं. कोणाचं आई-वडिलांबरोबर, कोणाची







पत्नीबरोबर, तर कोणाचं मुलांसोबत झालेलं बोलणं या कामगारांना जगण्याचं नव बळ देत होतं. सर्व कामगारांनी शारिरीक आणि मानसिक तंदरुस्तीसाठी एक दैनंदिन कार्यक्रम बनवला होता. बोगद्यात अडकलेल्या कामगारांशी संपर्क साधण्यासाठी सहा इंचाचा पाईप बोगद्यात टाकण्यात आला होता. या पाईपच्या माध्यमातून बचाव यंत्रणांनी कामगारांना मोबाईल फोन आणि बोर्ड गेम उपलब्ध करुन दिले होते. काही कामगारांना खैनीची गरज होती, ते ही त्यांना पुरवण्यात आलं. मानसिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी डॉक्टर कामगारांच्या सतत संपर्कात होते. डॉक्टरांनीच कामगारांना योगा करण्याच सल्ला दिला. वेळेवर जेवण देण्याचे प्रयत्न सर्वात महत्वाचं होतं ते म्हणजे कामगारांना बोगद्यात चांगलं जेवण पुरवणं. हे कामही सहा इंचाच्या पाईपच्या माध्यमातूनच करण्यात आलं. सतरा दिवस कागमारांसाठी केळी, सफरचंद, दालखिचडी आणि खाण्याचे इतर पदार्थ पाईपच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आलं. सर्वात महत्वाचं म्हणजे पाण्यासाठी बोगद्यातच नैसर्गिक स्त्रोत उपलब्ध होता.

# सैलानीबाबा यात्रेच्या यशस्वीतेसाठी सूक्ष्म नियोजन करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## यात्रा समन्वय समितीची पूर्वतयारी आढावा बैठक यंत्रणेमध्ये योग्य समन्वय राखण्याच्या सूचना मुबलक पाणी, अखंड वीजपुरवठा करण्याचे दिले निर्देश...

**जनसंचलन/बुलढाणा**

सैलानीबाबा यात्रेच्या यशस्वीतेसाठी सूक्ष्म नियोजन करा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले आहे.फिरते स्वच्छता गृह उप-लब्ध करून द्यावेत. त्यामध्ये मुबलक पाणीपुरवठा करावा. तसेच ती स्वच्छ ठेवावीत. यात्रा कालावधीमध्ये महावितरण विभागाने अखंडीत वीजपुरवठा करण्यावर विशेष भर देत, भारनियमन राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी. तसेच जनावरे कत्तलखाना व्यवस्थापन, वाहन तळांची योग्य व्यवस्था करणे, ध्वनीक्षेपकांवरून येथील सुविधांची यात्रेकरूंना माहिती देत राहणे, रस्त्यांची स्वच्छता, गर्दीचे योग्य व्यवस्थापन, नियोजन करणे, त्यासाठी सर्व समन्वय समितीमध्ये सहभागी असलेल्या विभागातील अधिकारी आणि कर्मचा-यांची नियुक्ती करणे, दर्गा परिसरात आवश्यक तिथे सीसीटीव्ही लावून गर्दीवर देखरेख ठेवणे, पोलीस आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या योग्य समन्वयातून रस्ता सुरक्षेच्या दृष्टिने गर्दी आणि वाहतुकीचे नियंत्रण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी दिल्या
तसेच ती स्वच्छ ठेवावीत. यात्रा कालावधीमध्ये महावितरण विभागाने अखंडीत वीजपुरवठा करण्यावर विशेष भर देत, भारनियमन राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी. तसेच जनावरे कत्तलखाना व्यवस्थापन, वाहन तळांची योग्य व्यवस्था करणे, ध्वनीक्षेपकांवरून येथील सुविधांची यात्रेकरूंना माहिती देत राहणे, रस्त्यांची स्वच्छता, गर्दीचे योग्य व्यवस्थापन, नियोजन करणे, त्यासाठी सर्व समन्वय समितीमध्ये सहभागी असलेल्या विभागातील अधिकारी आणि कर्मचा-यांची नियुक्ती करणे, दर्गा परिसरात आवश्यक तिथे सीसीटीव्ही लावून गर्दीवर देखरेख ठेवणे, पोलीस आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या योग्य समन्वयातून रस्ता सुरक्षेच्या दृष्टिने गर्दी आणि वाहतुकीचे नियंत्रण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी दिल्या.
तसेच या दरम्यान येणाऱ्या सर्व वाहनांची संख्या, यात्रेकरुंची संख्या, आणि मुक्कामी राहणारांच्या संख्येची शक्य झाल्यास माहिती मिळवावी. वाहनतळ व्यवस्था, ड्रोनच्या सहाय्याने गर्दीवर लक्ष ठेवणे यासह गर्दी नियंत्रित करण्यासाठी रस्त्यावर वाहने उभी राहता कामा नयेत, जेणेकरून जिल्हा प्रशासनाला मदत होऊ शकेल, असेही त्यांनी सांगितले. पाणीपुरवठा विभागाने टँकरच्या सहाय्याने मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा करावा तो करताना ब्लिचिंग पावडर वापरण्याबाबत योग्य ते नियोजन करावे. यात्रा कालावधीमध्ये सर्व परिसराचा नकाशा तयार करून विभागानुसार जबाबदारीचे वाटप करावे. पुरेसा प्रकाश देणारे पथदिवे, अग्निशामक यंत्रणा, वीज वितरण विभागाने स्टॉल्सच्या ठिकाणी




लावण्यात येणारी वीज उपकरणे यांची सुरक्षेच्या दृष्टीने पूर्ण तपासणी करावी, जेणेकरून यात्रा कालावधीमध्ये अनुचित घटना घडणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिले.

तसेच यात्रा कालावधीमध्ये आरोग्याच्या दृष्टीने अडचणी आल्यास तज्ज्ञ डॉक्टरासह आरोग्य पथक, सर्व वैद्कीय यंत्रणा, अत्यावश्यक सोयीसुविधांनी युक्त रुग्णवाहिका तयार ठेवावी यासह परिसरातील भक्त निवास, मंगल कार्यालये, शाळा या तात्पुरत्या ताब्यात घेऊन पोलीस कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी समन्वय करणाऱ्या जिल्हा यंत्रणेला दिले.

# बुलढाणा जिल्ह्याचे लोकप्रिय दैनिक निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहारी जनसंचलनच्या विशेष दिपावली अंकाचे वाचक वर्गाच्या हस्ते विमोचन...









# अखेर सरकार नरमले रविकांत तुपकरांच्या आंदोलनाला मिळले मोठे यश...

## बहुतांश मागण्या मान्य; सोयाबीन-कापूस दरवाढ प्रश्नावर आठवडाभरात केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत बैठक

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकऱ्यांच्या एकजुटीपुढे अखेर सरकार नरमले असून शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला मोठे यश आले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे झालेल्या बैठकीत रविकांत तुपकरांनी मांडलेल्या बहुतांश मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. तर सोयाबीन-कापूस प्रश्नाबाबत ना.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत येत्या आठ दिवसांत दिल्लीत बैठक बोलावली जाणार असून या बैठकीला रविकांत तुपकर देखील उपस्थित राहणार आहे. सरकारशी सकारात्मक चर्चा झाली आहे. काही मागण्या पंधरा दिवसांत काही मागण्या महिना भरात मार्गी लावण्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी रविकांत तुपकर यांना दिली आहे. तुपकरांच्या आंदोलनाचे हे मोठ यश मानले जात आहे. सोयाबीन -कापसाला दरवाढ मिळावी, तसेच येलो मोझॅक, बोंडअळीमुळे व पावसात खंड पडल्याने सोयाबीन-कापूस व इतर पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी एकरी १० हजार रुपये सरसकट नुकसान भरपाई मिळावी, सोयाबीनला ९ हजार तर कापसाला १२,५०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळावा यासह शेतकरी, शेतमजूर, महिला बचत गट, तरुणांच्या न्याय हक्काच्या मागण्यांसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मंत्रालयाचा ताबा घेण्याचा गंभीर इशारा दिला होता. त्यामुळे पोलिसांनी २५ नोव्हेंबर रोजी रविकांत तुपकरांना अटक केली होती, न्यायालयाने तुपकरांची अटक बेकायदेशीर ठरवली, त्यानंतर तुपकरांनी २५ नोव्हेंबर पासून अन्नत्याग आंदोलनाला चिखली तालुक्यातील सोमठाणा येथे सुरुवात केली व अन्नत्याग आंदोलन कायम ठेवून हजारो शेतकऱ्यांची फौज घेऊन रविकांत तुपकर २८ नोव्हेंबर रोजी मुंबईकडे रवाना झाले होते. २९ नोव्हेंबर रोजी त्यांनी मुंबईत धडक दिली. शेतकऱ्यांचे हे वादळ पाहता अखेर सरकारने तुपकरांना चर्चेचे निमंत्रण दिले आणि त्यानुसार तुपकरांसह एकूण २२ जणांचे शिष्टमंडळ सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे चर्चेसाठी पोहचले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री आ. डॉ. राजेंद्र शिंगणे, आ.डॉ. संजय कुटे तसेच सचिव तुकाराम मुंडे, अनुप कुमार यांच्यासह विविध विभागाचे दहा पेक्षा जास्त सचिव उपस्थित होते. यावेळी तुपकरांनी आपल्या सर्व मांगण्या मांडल्या. दोन तास चाललेल्या या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. सरकारने बहुतांश मागण्या मान्य केल्या असून पंधरा दिवसांत या मागण्या



पूर्ण करण्याची ग्वाही तुपकरांना दिली. या बैठकीत ना.फडणवीस यांनी ना.पियुष गोयल यांच्यासोबत दूरध्वनीवरून संवाद साधला व सोयाबीन-कापूस दरवाढ प्रश्नाबाबत येत्या आठ दिवसांमध्ये केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत दिल्लीत बैठक होणार आहे. ना.देवेंद्र फडवणीस यांच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळ या बैठकीला जाणार असून यामध्ये रविकांत तुपकरांचा देखील समावेश राहणार आहे. सोयापेंडीची आयात थांबवून निर्यात करावी, खाद्य तेल-ावरील आयात शुल्क ३० टक्के करावा, कापूस व सुत निर्यातीला प्रोत्साहन द्यावे, तेलबियांवरील जीएसटी रद्द करावा, जीएम सोयाबीन व कापसाला भारतात लागवडीची परवानगी मिळावा, सोयाबीन-कापसाच्या वायदेबाजावरील बंदी उठवा, कृषी कर्जावरील सीबीलची अट रद्द करा या केंद्र शासनाशी संबधीत असलेल्या मागण्यांवर या बैठकीत चर्चा करुन निर्णय घेतला जाणार आहे.

# दु:खद निधन वार्ता...

**जनसंचलन/बुलढाणा**

सौ.माधुरी मुकुंद( मामा ) उमाळकर यांचा हृदयविकाराच्या झटक्याने आज सकाळी दु:खद निधन झाले. त्यांचा अंतिम विधी शिवशॉपिंग कॉम्प्लेक्स येथून निघून उद्या दिनांक ३०/११/२०२३ रोजी सकाळी ९.३० जुनी हिंदू स्मशानभूमी आठवडी बाजार लाईन बुलढाणा येथे होईल.



सिटी न्युज व दैनिक जनसंचलन परिवारातर्फे भावपुर्ण श्रद्धांजली

# किनगाव जट्टू येथील बचत गटाची स्थापना

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

किनगाव जट्टू येथे संविधान दिनाचे औचित साधून श्रीकृष्ण संसायता बचत गटाची स्थापना करण्यात आली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहून प्रत्येक नागरिकांना जगण्याचा अधिकार व स्वातंत्र्य दिल्यामुळे, महिलांनी सुद्धा एकत्र येऊन प्रगतीची वाटचाल धरणे काळाची गरज आहे. यानुसार बचत गटाची स्थापना करण्यात आली, बचत गटाचे अध्यक्ष म्हणून कल्पना सातपुते व सचिव म्हणून आज वैशाली राऊत यांची निवड करण्यात आली. यावेळी सरला सोनी, गंगा जाधव,



रंजना राऊत, लक्ष्मी राऊत, गीता राऊत, रुक्मिना माळोदे, अश्विनी वायाळकर, गीता वायाळकर, हजर होत्या. बचत गट स्थापन करण्यासाठी रेखा कायंदे यांनी मार्गदर्शन सहकार्य केले. तदनंतर संविधानाचे वाचन करून भावगीताने सभेची सांगता झाली

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# सुशिक्षीत बेरोजगार युवकांचे बाहेरचे परिक्षा केंद्रे दिल्यामुळे आर्थिक व मानसिक खच्चीकरण थांबवा

## सुशिक्षीत बेरोजगार युवक महासंघाची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यामध्ये आज सुशिक्षत बेरोजगार यांच्याकडे शारीरीक, शैक्षणिक, व काम करण्याची प्रबळ इच्छाशक्ती असतांना केवळ हाताला काम नाही म्हणुन बेराजगारीच्या तनावात आज बेरच युवक आहेत त्यातच राज्यसरकाने खाजगी कंपनीला नोकर भरतीचे टेंडर देवुन परिक्षेचे आवेदन फी ही एक हजार रुपये केली मजबुरी चा फायदा सरकार घेत आहे. मुलांना कोणताही इनकम सोर्स नाही तसेच ते हाताला मिळेल त्या अल्पमानधनावर काम करीत राज्यातील युवक आज प्रदिर्घ कालावधी नंतर निघालेल्या आवेदन फॉर्म भरत सरकार नोकर भरती साठी आवेदन फॉर्मचे १००० रुपये चालान भरत आहे. म्हणुन खाजगी कंपनी यांनी आवेदन फॉर्म मध्ये विद्यार्थ्याला सोयीचे ठरेल असे तिन पंसतीचे ठिकान त्यामध्ये द्यावे असा कॉलम टाकला मुलांनी ही वाटले या पैकी एक सेंटर मिळेल पण अनेक मुलांना बुलडाण्यातील मुलांना धुळे जळगाव सारखे सेंटर मिळाले आहे. सकाळच्या शिप्टची ठेवण्यात आली बरेच ठिकाने हे मुख्यालया पासुन आड रस्त्यावर असल्याने नक्कीच मुलांची ॲटोचा व प्रवासाचा खर्च शिवाय राहण्याचा खर्च यांचा भुर्दंड विद्यार्थ्यांना बसनार आहे शिवाय महिलांना पाठवायचे म्हटल्यावर अनेक महिलांचे छोटे छोटे बाळ असल्यामुळे त्यांना संभाळण्यासाठी सोबत परिवारातील एकाजनाला न्यावे लागनार आहे. अश्या मागणिचे निवेदन घेवुन आज दिंनाक २९ नोव्हेंबर २०२३ रोजी सुशिक्षीत बेरोजगारांच्या न्याय हक्कासाठी आवाज उठविनारे समाजरत्न पुरस्कार प्राप्त तथा सुशिक्षीत बेरोजगार युवक महासंघाचे प्रमुख प्रभाकर वाघमारे याच्या नेतृत्वात शेकडो विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरी ने आज बुलडाणा निवासी जिल्हाधिकारी थोरात साहेब यांच्या सोबत चर्चा कुरुन मुख्यमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले आहे निवेदनामध्ये नमुद आहे की विद्यार्थ्यांना कुठलाही इनकम सोर्स नसल्याने तसेच ते सर्व शैक्षणीक पात्रता धारण करत असताना केवळ बेरोजगारांचा सावट म्हणुन हुकुमशाही पध्दतीने फी आकारली जात आहे आणि तरी सुध्दा राज्यातील बेराजगारांनी १००० रुपये फी भरली व शासनाच्या तिजोरीत भर पाडली. आमचे सरकारला विनंती आहे की, आवेदन फॉम मध्ये जे सेंटर जवळचे आहे ते नमूद केले आहे. मुलानी मूळ जिल्हयासह जवळिल तिन



जिल्हे टाकले असतांना सुध्दा त्या विद्यार्थ्याच्या विभागातला सोडुन इतर विभागातला जिल्हा का दिला आहे. उदा. बुलडणा जिहय़ामधील महिला विद्यार्थी यांना धुळे सेंटर मिळाले आहे.या त्या ठिकाणी पोहचण्याची वेळ १०:०० च्या आत असल्याने त्यांनी दिलेल्या वेळेच्या आत पोहचण्यासाठी रात्री मुक्कामी जावे लागेल तिथे अनोळखी ठिकान असल्याने राहण्याची व्यावस्था भाडयाचा खर्च अनेक युवती महिला हया छोटे छोटे लेकर असल्याने त्याना सोबती साठी एक घरातील माणूस न्यावा लागनार असल्याने आर्थीक व मानसिक खच्चीकरन होत आहे. तरी आपणास विनंती आहे की वरील मुदद्रयाचा विचार करुन उमेदवाराने पसंती दिलेल्या सेंटर पैकी एक सेंटर देवुन बेरोजगाराची मानसीक व आर्थिक खच्चीकरन थांबवावे ही विनंती. अश्या आशयाचे निवेदन देण्यात आले

# नरधामाला भर चौकात फाशी द्या- विजयकांत गवई




**जनसंचलन/बुलढाणा**

बोराखेडी पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या गावातील अडीच वर्षीय चिमुकडीवर अत्याचार करणाऱ्या नरधामाला भर चौकात फाशी देण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दि. २८ नोव्हेंबर रोजी निवेदन देण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांवर लहान लहान मुलींवर बलात्कार अत्याचार होत आहे त्यांना न्याय मिळत नाही बलात्कार आणि अत्याचार महिलांवर दिवसां दिवस चालू आहे अशा नरधामाला कठोर कारवाई होत नाही बुलढाणा जिल्ह्यामध्ये नरधामाला पाठीशी पोलीस प्रशासन घालत आहे व त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आहे त्यांच्यावर कोणीही कारवाई होवुशकत नाही म्हणून त्यांची ताकद आज वाढलेली आहे बुलढाणा जिल्ह्यामध्ये महिलांवर अन्याय अत्याचार होत आहे जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, गृहमंत्री, मुख्यमंत्री यांना निवेदन देऊनही सुद्धा महाराष्ट्र शासन कोणतीच कारवाई करत नाही महिलांना मान सन्मान देण्याचे काम महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकार मोठमोठ्या बातम्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून करत आहे पण बुलडाणा जिल्ह्यातील महिलांवर आणि लहान लहान मुलींवर, शाळेतील मुलींवर बलात्कार अत्याचार झाला की एकही लोकप्रतिनिधी या विषयावर बोलत नाही पिढीतांना न्याय देत नाही बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री पीडितांना न्याय देण्यासाठी कधीही धावून येत नाही अशी परिस्थिती या बुलढाणा जिल्ह्यातील महिलांवर झाली आहे महिलांना न्याय मिळत नाही आणि बोराखेडी प्रकरणातील त्या नरधामाला तात्काळ भर चौकात फाशी देण्यात यावे अन्यथा रिपब्लिकन सेनेच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर फाशी दो आंदोलन छेडण्याचा इशारा रिपब्लिकन सेनेचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष विजयकांत गवई यांनी निवेदनामध्ये दिला निवेदन देतेवेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष ब्रम्हा साळवे, जिल्हा महासचिव सलीमभाई, शहर उपाध्यक्ष सतीश पवार, सागर पवार, गोलू श्री सागर पदाधिकारी उपस्थित होते.

# बुलडाणा येथे कुक्कुट आणि पशुपालन प्रशिक्षण

**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारे जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करू इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी बुलडाणा येथे कुक्कट पालन व पशुपालनात शेळी, गाई आणि म्हशीपालनाच्या प्रशिक्षणाचे आयोजन दि ६ ते १० डिसेंबर २०२३ या कालावधीत करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त इच्छुक युवक-युवतींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन विभागीय अधिकारी प्रदीप इंगळे यांनी केले आहे. सुशिक्षित बेरोजगारांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग सुरू करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असल्यामुळे या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कट आणि गाई, म्हशी पालनाचे तंत्र आणि प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरू करण्यासाछर संपूर्ण सहकार्य त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन आणि सहकार्य तसेच शासकीय योजनांची माहिती या कालावधीत देण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवार हा किमान ५वी उत्तीर्ण असावा. तो १८ ते ५० वर्षादरम्यान असावा. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर त्याला प्रमाणपत्र दिले जाईल, तरी प्रशिक्षण नोंदणीसाठी ६ डिसेंबर २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारे जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालयाजवळ, मो. न. ८२७५०९३२०१, ९०११५७८८५४ संपर्क साधण्याचे आवाहन विभागीय अधिकारी प्रदीप इंगळे यांनी केले आहे.

# अवकाळी पावसामूळे नूकसानग्रस्त पिकांच्या नोंदी करा

**जनसंचलन/ बुलडाणा**

जिल्ह्यात सलग दोन दिवस झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे खरीप व रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, विमा काढलेल्या पिकांचे ॲपवर नोंदी करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यात २७ व २८ नोव्हेंबर रोजी झालेल्या बिगर मौसमी पावसामुळे तसेच वादळी वाऱ्यामुळे खरीप आणि रब्बी पिकांचे नुकसान झाल्यामुळे त्या पिकांची नोंद घेण्यात यावी. ही नोंद घेताना शेतकऱ्यांनी पुढील काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कपाशी, तूर, खरीप ज्वारी, गहू, हरभरा या पिकांच्या नोंदी घेताना नुकसानीचे कारण हे (बगर मोसमी पाऊस), (गारपीट) या दोन्हीपैकी ज्या कारणामुळे पीक नुकसान झाले आहे तेच कारण नमूद करावे.

कापूस, तूर, गहू, हरभरा, रब्बी कांदा पिकास (उभे पीक) असे




नमूद करावे. तर खरीप ज्वारी - काढणी पश्चात नुकसान व ( ) असे नमूद करणे आवश्यक आहे. या पद्धतीने उपरोक्त पिकाचे नुकसान टक्केवारी व इतर आवश्यक माहिती परिपूर्ण सादर करून पूर्वसूचना देण्याबाबत शेतकऱ्यांना अवगत करून घटना घडल्यापासून ७२ तासांचे आत पूर्वसूचना देणे आवश्यक राहिल. नुकसान पूर्वसूचना खालील पद्धतीने नोंदवता येईल. , भारतीय कृषी विमा कंपनी क्रमांक १८००४१९५००४, निशुल्क क्रमांक उपलब्ध न झाल्यास आपत्तीची माहिती विमा कंपनीचे तालुका, जिल्हा कार्यालय येथे द्यावी व पोच ठेवावी. या तिन्ही माध्यमातून पूर्वसूचना देता न आल्यास तालुका स्तरावरील कृषी विभागास पूर्वसूचना देण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# सैनिक आणि अग्नीवीर यांच्यात भेदभाव शहीदांप्रती अनास्था; विजय वडेट्टीवार यांची सरकारवर टीका...

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्राचे सुपुत्र अक्षय गवते यांना लडाखच्या सियाचिनमध्ये वीरमरण आलं होतं. अग्निवीर असलेले अक्षय गवते लाईन ऑफ ड्युटीवर तैनात होते. अक्षय गवते हे देशासाठी शहीद होणारे पहिले अग्निवीर ठरले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर अग्निवीरांच्या कुटुंबांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईचा मुद्दा चर्चेत आला होता. राज्य सरकारकडून त्यांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत करण्यात आली होती. यावर विधानसभेचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत राज्य सरकारवर टीका केली आहे.

विजय वडेट्टीवार यांनी ट्विट केले की, अक्षय गवते हा देशातला पहिला शहीद अग्निवीर आहे. त्याआधी पंजाबचा एक अग्नीवीर मृत्यू पावला होता. परंतु त्याने आत्महत्या केली असल्यामुळे त्याला अधिकृत शहीदाचा दर्जा मिळाला नाही. असे असताना देखील पंजाब सरकारने या अग्निवीराच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची मदत राज्य शासनाच्या वतीने दिली. महाराष्ट्र शासन सैनिक शहीद झाले तर त्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपये मदत देत असते. असे असताना सरकारने शहीद अग्निवीर अक्षय गवते यांच्या कुटुंबीयांना मात्र फक्त दहा लाख रुपयांची मदत जाहीर केली.ते पुढे म्हणाले की, सैनिक आणि अग्नीवीर यांच्यामध्ये करण्यात आलेला हा भेदभाव शहीदांप्रती अनास्था दाखवणारा असून राज्य शासनाने तातडीने त्याच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची मदत दिली पाहिजे. अक्षय लक्ष्मण गवते हा अग्नीवीर सियाचीन येथे भारतमातेच्या सीमेचे संरक्षण करत असताना शहीद झाला. त्यामुळे मदत देताना सैनिक - अग्नीवीर अशा प्रकारे भेदभाव करणे हा



अक्षयने देशासाठी दिलेल्या बलिदानाचे अपमान आहे. आगामी अधिवेशनामध्ये शहीद अक्षय गवते यांच्या बलिदानाला न्याय देण्यासाठी कुटुंबीयांना मदत देण्याची मागणी सरकारकडे करणार.

# देशातील ८० कोटी जनता आयते बसून खातेय, रेशन बंद करा - सदाभाऊ खोतांचे वादग्रस्त वक्तव्य...



जनसंचलन/बुलढाणा

गरीबांना रेशन देण्याची महत्वाकांक्षी योजना मोदी सरकार राबवित आहे. काँग्रेसनेही यापूर्वी या योजना राबविल्या आहेत. परंतू, मोदी सरकारने या धान्यात वाढ केली आहे. आपल्या देशातील ८० कोटी जनता ही ऐतखाऊ असल्याचे धक्कादायक वक्तव्य रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी केले आहे. या लोकांची रेशन व्यवस्था बंद करून देशाला बलशाली करावे असेही ते म्हणाले आहेत. रविकांत तुपकरांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी खोत बुलढाण्यात आले होते. शेतीवर अवलंबून असलेला आता ४० टक्केच समाज उरला आहे. देशात ८० कोटी लोक आयते बसून खात आहेत. यामुळे या लोकांची रेशन व्यवस्था बंद करावी, अशी मागणी खोत यांनी केली आहे. जर एवढी माणसे आयते खात असतील तर हा देश भिकाऱ्यांचा आहे. माणसांना भिकारी बनविण्याचे काम सुरु असे असे खोत म्हणाले आहेत. सर्वांना फुकट वाटण्याची राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा लागली आहे. हे फुकट, ते फुकट असे करता करता भिकाऱ्यांचा देश बनत चालला आहे. प्रत्येकाने कष्ट करावेत, त्यातूनच देश बलशाली होईल असेही खोत म्हणाले. महत्वाचे म्हणजे गरीबांना रेशन देण्याची महत्वाकांक्षी योजना मोदी सरकार राबवित आहे. काँग्रेसनेही यापूर्वी या योजना राबविल्या आहेत. परंतू, मोदी सरकारने या धान्यात वाढ केली आहे. य़ा योजनेला मोदी सरकार प्रचाराचा मुद्दा बनवत असताना भाजपाप्रणित युतीत असूनही खोत यांचे असे वक्तव्य चर्चेचा विषय ठरले आहे. सदाभाऊ खोत यांनी यापूर्वीही अनेकदा वादग्रस्त वक्तव्ये केली आहेत. टोमॅटो मिळाला नाही म्हणून कोणी मेलं का? असा सवालही खोत यांनी विचारला होता. राज्यकर्ते हे रेड्यांची औलाद, शरद पवारांना सैतान म्हणत त्यांना आता गोळ्या घालणार का, असेही खोत म्हणाले होते.

# जिल्हा लोकशाही दिन ४ डिसेंबर रोजी आयोजित

जनसंचलन/बुलढाणा




सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी, गाऱ्हाणी, अडचणी जाणून घेण्यासाठी व तक्रारींचे निरसन करण्यासाठी जिल्हा लोकशाही दिन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जातो. दिनांक ४ डिसेंबर २०२३ रोजी (सोमवार) दुपारी १ वाजता लोकशाही दिनाचे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. त्याबाबत अर्जदारांना लोकशाही दिनात अर्ज सादर करावयाचा असल्यास, तालुका स्तरावरील लोकशाही दिनात सदर तक्रारीचे निराकरण होवून प्राप्त अहवालानुसार समाधान न झाल्यास तालुका स्तरावरील प्राप्त अहवाल आणि टोकन क्रमांक जोडून जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात अर्जदाराने अर्ज विहीत नमुन्यात दोन प्रतीत अर्ज पाठविणे आवश्यक राहील तसेच तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावी अन्यथा अर्ज विचारात घेण्यात येणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे.

बुलढाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलढाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)